**19.09.2024** प्रभातःमुरली
ओम शांती
बापदादा
मधुबन

" गोड मुलांनो - तुमचे काम आहे आपणच आपल्याशी हितगुज करून पावन बनणे, दुसऱ्या आत्म्यांच्या चिंतनामध्ये आपला टाईम वेस्ट करू नका"

प्रश्नः- कोणती गोष्ट बुद्धीमध्ये आली तर जुन्या सर्व सवयी सुटतील?

उत्तरः- आपण बेहदच्या पित्याची संतान आहोत तर विश्वाचे मालक आहोत, आपल्याला देवता बनायचे आहे - ही गोष्ट बुद्धीमध्ये आली तर जुन्या सर्व सवयी सुटतील. तुम्ही सांगा अथवा नका सांगू आपणच सोडून देतील. उल्टे-सुल्टे खाणे-पिणे, दारू इत्यादी आपणच सोडून देतील. म्हणतील - 'वा! आम्हाला तर हे लक्ष्मी-नारायण बनायचे आहे. २१ जन्माचे राज्यभाग्य मिळत आहे तर का नाही पवित्र राहणार!'

ओम् शांती. बाबा वारंवार मुलांचे लक्ष वेधून घेतात की बाबांच्या आठवणीमध्ये बसला आहात? बुद्धी कुठे दुसरीकडे तर पळत नाही ना? बाबांना बोलावतातच यासाठी की 'बाबा, येऊन आम्हाला पावन बनवा'. पावन तर जरूर बनायचे आहे आणि नॉलेज तर तुम्ही कोणालाही समजावून सांगू शकता. हे सृष्टीचे चक्र कसे फिरते, कोणालाही तुम्ही समजावून सांगाल तर लगेच समजेल. भले पवित्र नसेल तरीही नॉलेज तर शिकेलच. काही मोठी गोष्ट नाहीये. ८४ चे चक्र आणि प्रत्येक युगाचा कालावधी इतका आहे, इतके जन्म होतात. किती सोपे आहे. याचा संबंध आठवणीशी नाही, हे तर आहे शिक्षण. बाबा तर योग्यच गोष्टी सांगतात. बाकी आहे सतोप्रधान बनण्याची गोष्ट. ते तर बनाल आठवणीने. जर आठवण केली नाहीत तर खूप कमी दर्जाचे पद प्राप्त कराल. इतके उच्च पद प्राप्त करू शकणार नाही म्हणूनच बाबा म्हणतात - अटेन्शन (लक्ष द्या). बुद्धीचा योग बाबांसोबत असावा. यालाच प्राचीन योग म्हटले जाते. टीचर सोबत तर योग प्रत्येकाचा असतोच. मुख्य गोष्ट आहे आठवणीची. आठवणीच्या यात्रेद्वारेच सतोप्रधान बनायचे आहे आणि सतोप्रधान बनून परत घरी जायचे आहे. बाकी शिक्षण तर एकदम सोपे आहे. अगदी लहान मुल देखील समजू शकेल. मायेचे युद्ध या आठवणी मध्येच चालते. तुम्ही बाबांची आठवण करता आणि माया मग आपल्याकडे आकर्षित करून विसरायला लावते. तुम्ही असे म्हणणार नाही की, 'माझ्यामध्ये तर शिवबाबा बसले आहेत, मी शिव आहे'. नाही, मी आत्मा आहे, शिवबाबांची आठवण करायची आहे. असे नाही, माझ्यामध्ये शिवाची प्रवेशता आहे. असे होऊ शकत नाही. बाबा म्हणतात - 'मी कोणामध्ये प्रवेश करत नाही. मी या रथावर (ब्रह्मा बाबांच्या तनामध्ये) स्वार होऊन तुम्हा मुलांना समजावून सांगतो. हो, कोणी जड-बुद्धी मुले असतील आणि समोर कोणी चांगला जिज्ञासू आला तर त्याच्या सेवेसाठी म्हणून मी प्रवेश करून दृष्टी देऊ शकतो. कायमचा बसू शकत नाही. बहुरूप धारण करून कोणाचेही कल्याण करू शकतो. बाकी असे कोणीही म्हणू शकत नाही की, 'माझ्यामध्ये शिवबाबांची प्रवेशता आहे, मला शिवबाबा असे सांगतात'. नाही, शिवबाबा तर मुलांनाच समजावून सांगतात. मुख्य गोष्ट आहेच पावन बनण्याची, जेणेकरून मग पावन दुनियेमध्ये जाऊ शकाल. ८४ चे चक्र तर खूप सोपे करून सांगतात. चित्र समोर लावलेली असावीत. बाबांशिवाय इतके ज्ञान तर कोणीही देऊ शकणार नाही. आत्म्यालाच नॉलेज मिळते. त्यालाच ज्ञानाचा तिसरा नेत्र म्हटले जाते. आत्म्यालाच सुख-दुःख होते, त्याला हे शरीर मिळाले आहे ना. आत्माच देवता बनते. कोणी बॅरिस्टर, कोणी व्यापारी आत्माच बनते. तर आता आत्म्यांशी बाबा बसून बोलतात, आपली ओळख देतात. तुम्ही जेव्हा देवता होता तेव्हा मनुष्यच तर होता, परंतु पवित्र आत्मे होता. आता तुम्ही पवित्र नाही आहात त्यामुळे तुम्हाला देवता म्हणू शकत नाही. आता देवता बनण्यासाठी पवित्र जरूर बनायचे आहे. त्याच्यासाठी बाबांची आठवण करायची आहे. मुले जास्त करून हेच सांगतात - 'बाबा, माझ्याकडून ही चूक झाली ज्यामुळे मी देह-अभिमानामध्ये आलो'. बाबा बसून मुलांना समजावून सांगतात पावन जरूर बनायचे आहे. कोणतेही विकर्म करू नका. तुम्हाला सर्वगुण संपन्न इथेच बनायचे आहे. पावन बनल्याने मुक्तिधाममध्ये निघून जाल. जास्त काही प्रश्न विचारण्याची गरजच नाही. तुम्ही स्वतःशी गोष्टी करा, दुसऱ्या आत्म्यांचे चिंतन करू नका. म्हणतात युद्धामध्ये २ करोड मेले. इतके आत्मे कुठे गेले? अरे, ते कुठेही जावो, त्यामुळे तुमचे काय अडले आहे. तुम्ही टाईम वेस्ट का करता? जास्त काही विचारण्याची गरजच नाही. तुमचे काम आहे पावन बनून पावन दुनियेचा मालक बनणे. दुसऱ्या कोणत्याही

गोष्टींमध्ये गेल्याने गोंधळून जाल. कोणाला व्यवस्थित उत्तर मिळाले नाही तर गोंधळून जातात.

बाबा म्हणतात - मनमनाभव. देहासहीत देहाचे सर्व संबंध सोडा, तुम्हाला माझ्याकडेच यायचे आहे. व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर जेव्हा स्मशानामध्ये घेऊन जातात त्यावेळी तोंड इकडे आणि पाय स्मशानाकडे ठेवतात आणि जेव्हा स्मशानाच्या जवळ पोहोचतात तेव्हा पाय इकडे आणि तोंड स्मशानाकडे करतात. तुमचे देखील घर वर आहे ना. वरती कोणीही पतित जाऊ शकत नाही. पावन बनण्यासाठी बुद्धीचा योग बाबांशी लावायचा आहे. बाबांकडे मुक्तिधाममध्ये जायचे आहे. पतित आहेत म्हणून बोलावतात की आम्हा पतितांना येऊन पावन बनवा, लिब्रेट करा. तर बाबा म्हणतात - 'आता पवित्र बना'. बाबा ज्या भाषेमध्ये समजावून सांगतात, त्याच भाषेमध्ये कल्प-कल्प समजावून सांगतील. जी भाषा यांची (ब्रह्मा बाबांची) असेल, त्याच भाषेमध्ये समजावून सांगतील ना. आजकाल हिंदी खूप चालते, असे नाही की भाषा बदलू शकते, नाही. संस्कृत इत्यादी भाषा काही देवतांची तर नाही आहे. हिंदू धर्माची संस्कृत भाषा नाहीये. हिंदीच असायला हवी. मग संस्कृत भाषा का वापरतात? तर बाबा समजावून सांगत आहेत - 'इथे जेव्हा बसता तेव्हा बाबांच्या आठवणीमध्येच बसायचे आहे, इतर कोणत्याही गोष्टींमध्ये तुम्ही जाऊच नका. इतके मच्छर होतात, मग ते कुठे जातात? भूकंपामध्ये एका फटक्यात प्रचंड प्रमाणात माणसे मरतात, मग ते सर्व आत्मे कुठे जातात? त्यांच्याशी तुम्हाला काय करायचे आहे. तुम्हाला बाबांनी श्रीमत दिले आहे की आपल्या उन्नतीसाठी पुरुषार्थ करा. बाकी गोष्टींच्या चिंतनामध्ये जाऊ नका. याने तर अनेक गोष्टींचे चिंतन होईल. बस, तुम्ही माझी आठवण करा, ज्याच्यासाठी मला बोलवले आहे त्याप्रमाणे चाला. तुम्हाला बाबांकडून वारसा घ्यायचा आहे, इतर गोष्टींमध्ये जायचे नाही म्हणूनच बाबा वारंवार म्हणतात - अटेन्शन! इतरत्र कुठे बुद्धी तर जात नाही. भगवंताचे श्रीमत तर मानले पाहिजे ना. बाकीच्या कोणत्याही गोष्टींमध्ये काहीच फायदा नाही. मुख्य गोष्ट आहेच पावन बनण्याची. हे पक्के लक्षात ठेवा - आपले बाबा, बाबा देखील आहेत, टीचर देखील आहेत, तर प्रिसेप्टर (गुरु) देखील आहेत. हे जरूर मनामध्ये लक्षात ठेवायचे आहे - बाबा, पिता देखील आहेत, आम्हाला शिकवतात, योग शिकवतात. शिक्षक शिकवतात तर बुद्धीचा योग टीचरमध्ये आणि अभ्यासामध्ये सुद्धा जातो. असेच बाबा देखील म्हणतात - 'तुम्ही बाबांचे तर बनले आहात. मुले तर आहातच, तेव्हाच तर इथे बसले आहात. टीचर कडून शिकत आहात. कुठेही असलात तरी बाबांची मुले तर आहातच मग अभ्यासावर अटेंशन (लक्ष) द्यायचे आहे'. शिवबाबांची आठवण कराल तर विकर्म विनाश होतील आणि तुम्ही सतोप्रधान बनाल. हे नॉलेज दुसरे कोणीही देऊ शकणार नाही. मनुष्य तर घोर अंधारामध्ये आहेत ना. ज्ञानामध्ये पहा किती ताकद आहे. ताकद कुठून मिळते? बाबांकडून ताकद मिळते ज्याद्वारे तुम्ही पावन बनता. आणि शिक्षण देखील सोपे आहे. त्या (लौकिक) शिक्षणामध्ये तर खूप महिने लागतात. इथे तर ७ दिवसांचा कोर्स आहे. ज्यामुळे तुम्हाला सर्व काही समजेल ते तर मग बुद्धीवर अवलंबून आहे. कोणाला जास्त वेळ लागतो, कोणाला कमी. कोणाला तर २-३ दिवसांमध्ये चांगल्या रीतीने समजते. मुख्य गोष्ट आहे बाबांची आठवण करणे, पवित्र बनणे. तेच अवघड वाटते. बाकी शिक्षण तर अतिशय साधे-सोपे आहे. स्वदर्शन चक्रधारी बनायचे आहे. एका दिवसाच्या कोर्समध्ये देखील सर्व काही समजू शकता. आपण आत्मा आहोत, बेहदच्या पित्याची संतान आहोत तर जरूर आपण विश्वाचे मालक आहोत. हे बुद्धीमध्ये येते ना. देवता बनायचे आहे तर दैवी गुण देखील धारण करायचे आहेत, ज्यांच्या बुद्धीमध्ये हे येईल ते ताबडतोब सर्व वाईट सवयी सोडून देतील. तुम्ही सांगा अथवा नका सांगू आपणच सोडून देतील. उल्टे-सुल्टे खाणे-पिणे, दारू इत्यादी आपणच सोडून देतील. म्हणतात - 'वाह, आम्हाला असे बनायचे आहे, २१ जन्मांसाठी राज्य मिळते तर का नाही पवित्र रहाणार'. अगदी चिकटले पाहिजे. मुख्य गोष्ट आहे आठवणीची यात्रा. बाकी ८४ च्या चक्राचे नॉलेज तर एका सेकंदामध्ये मिळते. बघता क्षणी समजून जातात. नवीन झाड जरूर छोटे असेल. आता तर झाड किती मोठे तमोप्रधान बनले आहे. उद्या मग नवीन छोटे बनेल. तुम्ही जाणता हे ज्ञान कधीही कुठेही मिळू शकणार नाही. हे शिक्षण आहे, पहिली मुख्य शिकवण मिळते की, बाबांची आठवण करा. बाबा शिकवतात, हा निश्चय करा. भगवानुवाच - मी तुम्हाला राजयोग शिकवतो. दुसरा कोणीही मनुष्य असे म्हणू शकणार नाही. टीचर शिकवतात तर जरूर टीचरची आठवण करतील ना. बेहदचे पिता देखील आहेत, बाबा आम्हाला स्वर्गाचा मालक बनवतात. परंतु आत्मा पवित्र कशी बनेल - हे मात्र कोणीही सांगू शकत नाही. भले स्वतःला भगवान म्हणू देत नाहीतर आणखी काही म्हणू देत परंतु पावन बनवू शकत नाहीत. आजकाल भगवान तर खूपच झाले आहेत. मनुष्य गोंधळून जातात. म्हणतात - 'बरेच धर्म येतात, काय माहित कोणता धर्म बरोबर आहे'! भले तुमची प्रदर्शनी किंवा म्युझियम इत्यादीचे उद्घाटन करतात परंतु समजत काहीच नाहीत. वास्तविक उद्घाटन तर झालेलेच आहे. अगोदर फाऊंडेशन घातले जाते, मग जेव्हा

घर बनून तयार होते तेव्हा उद्घाटन होते. फाऊंडेशन घालण्यासाठी देखील बोलावले जाते. तर हा यज्ञ देखील बाबांनी स्थापन केला आहे, बाकी नवीन दुनियेचे उद्घाटन तर होणारच आहे, तिथे कोणाचे उद्घाटन करण्याची गरज राहत नाही. उद्घाटन तर आपोआप होणारच. इथे शिकून मग आपण नवीन दुनियेमध्ये निघून जाणार.

तुम्ही समजता आता आपण स्थापना करत आहोत ज्याच्यासाठीच मेहनत करावी लागते. विनाश होईल मग ही दुनियाच बदलून जाईल. मग तुम्ही नवीन दुनियेमध्ये राज्य करण्यासाठी याल. सतयुगाची स्थापना बाबांनी केली आहे मग तुम्ही याल तेव्हा स्वर्गाची राजधानी मिळेल. बाकी ओपनिंग सेरेमनी (उद्घाटन सोहळा) कोण करणार? बाबा तर स्वर्गामध्ये येत नाहीत. नंतर पुढे पहायचे आहे स्वर्गामध्ये काय होते, अंताला काय होते; नंतर पुढे समजेल. तुम्ही मुले जाणता पवित्रते शिवाय आपण विद् ऑनर (सन्मानाने) स्वर्गामध्ये जाऊ शकत नाही. इतके पद देखील प्राप्त होणार नाही; म्हणूनच बाबा म्हणतात - 'खूप पुरुषार्थ करा'. धंदा इत्यादी भले करा परंतु जास्ती पैसा काय करणार. खाऊ तर शकणार नाही. तुमची मुले-नातवंडे इत्यादी सुद्धा खाणार नाहीत. सर्वकाही मातीमध्ये मिसळून जाईल म्हणून युक्तीने थोडासा स्टॉक ठेवा. बाकी तर सर्व तिथे ट्रान्सफर करा. सर्वच तर ट्रान्सफर करू शकत नाही. गरीब लवकर ट्रान्सफर करतात. भक्ती मार्गामध्ये देखील दुसऱ्या जन्माकरिता ट्रान्सफर करतात. परंतु ते आहे इनडायरेक्ट. हे आहे डायरेक्ट. पतित मनुष्यांची पतितांसोबतच देवाण-घेवाण आहे. आता तर बाबा आले आहेत, तुमची तर पतितांसोबत देवाण-घेवाण नाहीये. तुम्ही आहात ब्राह्मण, ब्राह्मणांनाच तुम्ही मदत करायची आहे. जे स्वतः सर्विस करतात, त्यांना तर मदतीची गरज नाही. इथे गरीब, श्रीमंत इत्यादी सर्व येतात. बाकी करोडपती तर फार मुश्किलीने येतील. बाबा म्हणतात - 'मी आहे गरीब निवाज'. भारत अतिशय गरीब खंड आहे. बाबा म्हणतात, मी येतो देखील भारतामध्येच, त्यामध्ये देखील हे आबू सर्वात मोठे तीर्थ आहे जिथे बाबा येऊन संपूर्ण विश्वाची सद्गती करतात. हा आहे नरक. तुम्ही जाणता नरका पासून मग स्वर्ग कसा बनतो. आता तुमच्या बुद्धीमध्ये संपूर्ण ज्ञान आहे. बाबा पावन बनण्याची अशी युक्ती सांगतात, ज्याद्वारे सर्वांचे कल्याण करतात. सतयुगामध्ये कोणतीही अकल्याणाची गोष्ट, रडणे, मारणे इत्यादी काहीच नसते. आता बाबांची महिमा आहे - ज्ञानाचा सागर, सुखाचा सागर. आता तुमची देखील ही महिमा आहे, जी बाबांची आहे. तुम्ही देखील आनंदाचे सागर बनता, अनेकांना सुख देता मग जेव्हा तुमची आत्मा संस्कार घेऊन नवीन दुनियेमध्ये जाईल तेव्हा तिथे मग तुमची महिमा बदललेली असेल. मग तुम्हाला म्हणणार, सर्व गुण संपन्न… आता तुम्ही नरकामध्ये बसले आहात, याला म्हटले जाते काट्यांचे जंगल. बाबांनाच 'बागवान', 'नावाडी' म्हटले जाते. गातात देखील - 'हमारी नईया पार करो', कारण दुःखी आहेत तर आत्मा बोलावते. महिमा भले गातात परंतु समजत काहीच नाहीत. जे येईल ते बोलतात. सर्वश्रेष्ठ भगवंताची निंदा करत राहतात. तुम्ही म्हणाल आम्ही तर आस्तिक आहोत. सर्वांचे सद्गती दाता जे बाबा आहेत, त्यांना आम्ही जाणले आहे. बाबांनी स्वतः परिचय दिला आहे. तुम्ही भक्ती करत नाही तर तुम्हाला किती हैराण करतात. ते आहेत मेजॉरिटी, तुमची आहे मायनॉरिटी. जेव्हा तुमची मेजॉरिटी होईल, तेव्हा त्यांना देखील आकर्षण होईल. बुद्धीचे कुलूप उघडेल. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) आपल्या उन्नतीचेच चिंतन करायचे आहे, इतर कोणत्याही गोष्टीमध्ये जायचे नाही. अभ्यास आणि आठवणीवर पूर्णपणे लक्ष द्यायचे आहे. बुद्धीला भटकू द्यायचे नाही.
2. २) आता बाबा डायरेक्ट आले आहेत त्यामुळे आपले सर्व काही युक्तीने ट्रान्सफर करायचे आहे. पतित आत्म्यांसोबत देवाण-घेवाण करायची नाही. विद् ऑनर (सन्मानाने) स्वर्गामध्ये जाण्यासाठी पवित्र जरूर बनायचे आहे.

वरदान:- मन आणि बुद्धीला व्यर्थ पासून मुक्त ठेवून ब्राह्मण संस्कार बनविणारे रुलर भव

कोणतीही छोटीशी व्यर्थ गोष्ट, व्यर्थ वातावरण अथवा व्यर्थ दृश्याचा प्रभाव पहिला मनावर पडतो मग बुद्धी त्याला सहयोग देते. मन आणि बुद्धी जर त्याच प्रकारे चालत राहिली तर तो संस्कार बनतो. मग वेग-वेगळे संस्कार दिसून येतात, जे ब्राह्मण संस्कार नाही आहेत. कोणत्याही व्यर्थ

संस्काराच्या अधीन होणे, आपल्याशीच युद्ध करणे, वारंवार खुशी नाहीशी होणे - हे क्षत्रियपणाचे संस्कार आहेत. ब्राह्मण अर्थात रुलर (शासक) व्यर्थ संस्कारांपासून मुक्त असतील, परवश नाही.

बोधवाक्यः- मास्टर सर्वशक्तिवान तो आहे जो दृढ प्रतिज्ञेद्वारे सर्व समस्यांवर सहजच मात करेल.

||| ओम शांती |||